# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 16/12/2022 (शुक्रवार) दुपार

---

## दुखापत

१) **पो.स्टे. जलालखेडा** :— अंतर्गत १५ कि.मी. अंतरावरील मौजा भिष्णुर येथे दिनांक १५/१२/२०२२ ते १९.०० वा. ते १९.३० वा. सुमारास फिर्यादी नामे— रमेश उर्फ बंडु पांडुरंगजी नासरे, वय ५९ वर्ष, रा. भिष्णुर ता. नरखेड याचा मुलगा जखमी नामे —राहुल रमेश नासरे, वय २५ वर्ष, रा. भिष्णुर ता. नरखेड हा आर्मी मध्ये ड्युटीवर असुन तो सुट्टीवर गावाला आला असुन आरोपी नामे—जय मानिकरावजी रेवतकर हा त्याचा मित्र असुन फिर्यादीचा मुलगा राहुल याने आरोपीस उसनवारीने १००००/— रू. दिले होते ते पैसे परत मागितले असता आरोपीने पैसे परत न देता फिर्यादीचे मुलास लोखंडी पाईपने मारहाण केल्याने डावे डोळयाला जबर मार लागला नाकातुन रक्त निघाले व गंभीर जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. जलालखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३२६, ५०४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास तपास सहायक फौजदार अनिल जोशी ब. नं. ५२६ पो.स्टे जलालखेडा मो. नं. ७४९९७६०७२८ हे करीत आहे.

२) **पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ०६ कि.मी. अंतरावरील वाघोडा मा. काटोल येथे दिनांक १५/१२/२०२२ ते २०.०० वा. सुमारास फिर्यादी नामे—गौतम प्रल्हादजी गजभिये, वय ३७ वर्ष, रा. वाघोडा ता. काटोल यांचा चुलत भाऊ आरोपी नामे— मंगेश केशवराव गजभिये, रा. वाघोडा ता. काटोल हा दारू पिवून त्याचे पत्नीसोबत भांडण करित होता म्हणून फिर्यादी हे आरोपीस समजविण्यास गेले असता, आरोपीने फिर्यादीस हातबुक्कीने मारपीट करून रोडवर खाली पाडले त्यामुळे फिर्यादीचे डावे भागाचे कपाळावर मार लागुन रक्त निघाले व शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३२४, ५०४, ५०६ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपींचा शोध घेणे सुरु असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नाईक ब. नं. ३९८ भुषण मदनकर पो. स्टे. काटोल हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**